Publication: Saamana
Date: 19/6/2019
Page: 9
Column: 4

सामना
बुधवार
दि. १९ जून २०१९

# पावसाळ्यासाठी 'अदानी' सज्ज

## ▪ वीजग्राहकांसाठी २४ तास टोल फ्री क्रमांक सुरू

मुंबई, दि. १८ (प्रतिनिधी) – अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) या वीज वितरक कंपनीने पावसाळ्यात ग्राहकांना त्रास होऊ नये यासाठी त्यांच्या विभागांमध्ये सुरक्षितता उपायांची घोषणा केली. कोणत्याही आपत्तीजनक परिस्थितीचे निराकरण करण्यासाठी सेंट्रल डिझास्टर कंट्रोल रूम (सीडीसीआर) कार्यान्वित केले आहे. तसेच अदानीने ग्राहकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी १९१२२ हा टोल फ्री क्रमांक सुरू केला आहे.

पावसाळ्यात आग लागणे किंवा विजेचा धक्का लागणे यासारख्या घटना घडतात. अशा घटना घडल्यास मदतीसाठी जून ते सप्टेंबरदरम्यान ग्राहक ३००९९१११/३००९७२२५ या क्रमांकावर थेट सेंट्रल डिझास्टर कंट्रोल रूमकडे तक्रार करू शकतात. पावसाळ्यात ग्राहकांनी सुरक्षिततेसंदर्भात काय काळजी घ्यावी, याच्या सूचनादेखील ग्राहकांना केल्या आहेत. परिसराला वीजपुरवठा करणारी मीटर केबिन पाणी तुंबण्यापासून किंवा पाणी गळतीपासून सुरक्षित असल्याची खात्री करून घ्या, वायरिंगमध्ये बदल केला असल्यास त्याची परवानाधारक विद्युत कंत्राटदाराकडून पूर्णपणे तपासणी करून घ्या, अशा सूचना ग्राहकांना दिल्या आहेत.